अभिवादन



बक्षीजींचं एकच स्वप्न होतं: ऑल इंडियावर माझं एक गीत यावं...

भारतवर्षातला सगळ्यात महान कवी आज आपल्यात नाही. तो मैफल अर्ध्यावरच सोडून गेला. हा कवी म्हणायचा, 'मै शायर तो नही, मगर ऐ हसी, जबसे देखा मैने तुझको मुझको शायरी आ गयी...'

२१ जुलै १९३० रोजी रावळपिंडी (पाकिस्तान) येथे जन्मलेल्या आनंद बक्षींनी ९ नोव्हेंबर १९५६ ला युनिटी फिल्मसच्या *भला आदमी*साठी 'धरती के लाल ना कर इतना मलाल...' हे गीत पहिल्यांदा लिहिलं आणि चित्रपट गीतकार म्हणून आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली. हे गीत त्यांनी संगीतकार निसार यांच्या संगीत दिग्दर्शनात लिहिलं. पण त्यांची गीतं असलेला पहिला प्रदर्शित चित्रपट १९५७ साली प्रदर्शित झाला. बक्षीसाहेबांचा आठवा चित्रपट *सीआयडी गर्ल*मध्ये त्यांना संगीतकार रोशनसाहेबांची साथ पहिल्यांदा मिळाली. चौतिसावा चित्रपट *सुनहरी नागीन*मध्ये कल्याणजी-आनंदजींबरोबर पहिल्यांदा काम करण्याची तर एकेचाळीसावा चित्रपट *मि. एक्स इन बॉम्बे*च्या वेळी लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांची तर चोपन्नावा चित्रपट *तीसरा कौन*च्या वेळी आर.डी.बर्मन यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. नंतर त्यांनी या सगळ्यांबरोबर अनेक वेळा काम केलं होतं.

गमतीची गोष्ट अशी की, आनंद बक्षी यांनी आर.डी. बर्मनबरोबर अगोदर काम केलं आणि चार वर्षांनंतर त्यांचे वडील एस.डी. बर्मन यांच्याबरोबर *आराधना*साठी गीतं लिहिण्याची संधी त्यांना मिळाली.

बक्षीसाहेबांनी आजवर ६००पेक्षा अधिक चित्रपटांसाठी चार हजारपेक्षा अधिक गीतं लिहिली. इतकी गीतं आजवर एकाही गीतकाराच्या खाती जमा नाहीत.

आनंद बक्षी मुंबईला आले ते गीतकार बनण्याच्या हेतूने नाहीच. त्यांचं स्वप्न होतं गायक बनण्याचं. त्यावेळी त्यांच्या पोतडीत दोन गीतांचे मुखडे होते. त्यातलं एक गाणं होतं, 'मैने पूछा चांद से के देखा है कही, मेरे यार सा हसी, चांद ने कहा चांदनी की कसम नही नही नही....' आणि दुसरं होतं, 'बलमा सिपईया, हाय रे तेरी बंदूक से डर लागे, लागे रे जिया, धक् धक् जोर से भागे...'

बक्षीसाहेबांनी आपल्या संघर्षाच्या काळात एक-दोन चित्रपटांत एक्स्ट्राच्या भूमिकाही केल्या. मनोजकुमार त्यांची एक आठवण सांगतो. तो आणि बक्षीसाहेब फिल्मीस्तानच्या एका चित्रपटासाठी मजरूह सुलतानपुरींचं एक गीत एक्स्ट्रा म्हणून एकत्र गाऊन आपल्या पोटाची खळगी भरली होती. आनंद बक्षी नेव्ही आणि आर्मी दोन्हीसाठी काम करत होते. नेव्हीत ते कॅडेट होते तर आर्मीमध्ये रेडियो सिग्नल ऑपरेटर. बक्षीसाहेबांचा मुलगा राकेश सांगतो, 'नेव्हीत नोकरी करण्याचा त्यांचा हेतू वेगळाच होता. ते जाणून होते की स्टीमर कधीतरी मुंबईला जाईल. आणि अशाप्रकारे ते आपल्या स्वप्ननगरीत दाखल झाले.' आर्मी आणि नेव्हीत ते आवर्जून रात्रपाळी मागून घेत असत. त्यामागचं कारणही खास होतं. आपल्या रचना विशेषतः पेरोडी ऐकवून ते इतर मित्रांना रात्रभर जागं ठेवत असत. या दरम्यान त्यांनी आपलं टोपण नाव आझाद असं ठेवलं होतं. बक्षींचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते नेहमी स्वतःचीच गाणी गात.

बक्षींना बोरिवलीचा एक तिकीट कलेक्टर चित्रमल नेहमी आठवत असे. त्याने ओळखदेख नसताना बक्षींना आपल्या घरात ठेवलं. तब्बल पाच वर्षं, तेही एक पैसा न घेता. त्या गृहस्थांच्या आठवणीने बक्षीजी हेलावून जात. म्हणत, 'पुढे मी मोठा गीतकार म्हणून नावारूपाला आलो तरीही त्यांनी माझ्याकडून ते पैसे कधीच घेतले नाहीत आणि आयुष्यात हे एकच ऋण मी कधीही फेडू शकणार नाही!'

बक्षीजी चित्रपट जगताला आपल्या परिवाराइतकंच महत्त्वाचं मानत. 'गेली अनेक वर्षं मी या क्षेत्रात काम करतोय. माझ्यासाठी हे दुसरं घरच आहे. तेव्हा आपल्या घरातल्या गोष्टी किंवा तक्रारी मी बाहेर कशा सांगणार?'

बक्षी तसे मितभाषी होते. दिवसभर ते आपल्याच विचारात मग्न असायचे नाहीतर मनातले विचार कागदावर कवितेच्या रूपात उतरवताना दिसायचे. भाषण देणं त्यांना अजिबात आवडत नसे. अशा वेळी ते हळूच बाजूला व्हायचे.

बक्षीजींना *अपनापन*, *एक दूजे के लिये* आणि *ताल* या चित्रपटांसाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता.

३० मार्चला त्यांनी इहलोकाची यात्रा संपवली. त्यांना लिव्हरचा कॅन्सर होता.

बक्षीजींच्या परिवारात त्यांच्या पत्नी, दोन मुलगे आणि दोन मुली आहेत. त्यांच्या पत्नी चित्रपटजगतापासून लांब राहिल्या. दोन्ही मुली विवाहित आहेत. एक मुलगा राजेश चित्रपट निर्मितीत आहे तर दुसरा राकेश सुभाष घईंकडे सहाय्यक म्हणून काम करतोय.

बक्षी अत्यंत संवेदनशील व्यक्ती होते. *आराधना*ला मिळालेलं यश पाहून शक्ती सामंतांनी बक्षींना एक गाडी भेट दिली तेव्हा त्यांनी त्या गाडीचे पैसे शक्ती सामंतांना दिले. का? तर गाडी त्यांच्या मैत्रीला महाग पडू नये, असं त्यांचं प्रामाणिक मत होतं.

या वयालाही बक्षीसाहेब स्वतःची कामं स्वतःच करत. कोणत्याही निर्मात्याने त्यांच्याविरुद्ध कधी तक्रार केली नाही. काही गीतकारांनी त्यांना मानधन वाढवण्याविषयी सुचवलं तेव्हा ते म्हणत, 'मला आवश्यकतेपेक्षा जास्तच मिळालं आहे. आज माझ्याकडे तीन गाड्या आहेत, आलिशान फ्लॅट आहे. आणि मी तर ऑल इंडिया रेडियोवर माझं फक्त एक गीत ऐकण्याचं स्वप्नं उराशी बाळगून मुंबईला आलो होतो. आणि मला अपेक्षेपेक्षा पाच हजारपट अधिक यश मिळालं आहे. आता मला काही नको!'

□ विजय अकेला